महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक: एनओटी-३६१८/सीआर-३१/२०१८/तीन दिनांक: ६ ऑगस्ट, २०१९

# घोषणा

**विषय**: महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा २०१९ – अर्ज सादर करण्याबाबत

जाहिरात क्रमांक ०४/२०१९, दिनांक ८ मार्च, २०१९ नुसार आयोगामार्फत रविवार, दिनांक २६ मे, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वन सेवा पूर्व परीक्षा २०१९ चा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ३ ऑगस्ट, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाच्या संकेतस्थळावर महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा २०१९ करीता दिनांक ३ ऑगस्ट, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेचे काळजीपूर्वक अवलोकन करुन आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक १९ ऑगस्ट, २०१९** पर्यंत अर्ज सादर करणे तसेच विहित कालावधीत परीक्षा शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे. त्याशिवाय मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

**३.** आयोगास अर्ज सादर करण्याची तसेच परीक्षा शुल्काचा भरणा करण्याची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण न केल्यास यासंदर्भातील तक्रारींची नंतर दखल घेतली जाणार नाही.

**४.** परीक्षेच्या प्रवेशासंदर्भात विहित दिनांकानंतर संपर्क साधल्यास त्याचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

ठिकाण:- मुंबई

उप सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग